


मुंबई, मंगळवार, ३० जुलै २०२४ मुंबई तरुण भारत

# अनधिकृत बांधकामे सिडकोच्या रडारवर

**पाच वर्षांत ५ हजार अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त**

**नवी मुंबई, दि. २९ : प्रतिनिधी**

गेल्या पाच वर्षांत शहर व औद्योगिक विकास महामंडळाने (सिडको) नवी मुंबई आणि नैना परिसरातील पाच हजार अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे, होर्डिंग्ज, क्रशर, डेब्रिज डंपिंग आणि माती चोरीवर कारवाई केली आहे. बेकायदेशीर डंपिंग आणि मातीचोरीच्या विरोधात नियोजन संस्थेने ४८ गुन्हे नोंदविले आहेत. सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली.

२०२१ ते २०२४ या कालावधीत सिडकोने नवी मुंबई आणि नैना परिसरात अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे, होर्डिंग्ज, क्रशर, डेब्रिज डंपिंग आणि माती चोरीच्या विरोधात धडक कारवाई केली. बेकायदेशीर डंपिंग आणि माती चोरीच्या विरोधात ४८ गुन्हे दाखल केले असून १२४ वाहने जप्त केली आहेत.

जानेवारी २०२० ते जून २०२४ या कालावधीत, कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करून, अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणांच्या विरोधात एकूण ९६८ निष्कासन मोहीम राबविण्यात आली. या कारवाई दरम्यान एकूण २५८ आरसीसी बांधकामे, ६४० वीट बांधकामे, ४ हजार, ५८७ तात्पुरती अतिक्रमणे, झोपड्या, २४४ होर्डिंग्ज आणि १५ क्रशर हटविण्यात आले आहेत.